श्री.महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी, ता.कामठी, जि.नागपूर या तीर्थस्थळाचा विकास आराखडा मंजुरीबाबत..

महाराष्ट्र शासन

नगरविकास विभाग,

शासन निर्णय, क्रमांक-नासुप्र-२०१५/युओआर-५८/प्र.क्र.११४/नवि-२६

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०२ जानेवारी, २०१६

वाचा :-

१) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास,नागपूर यांचे पत्र क्र.काअ(गृहनिर्माण)/सीएच/४४१ दि.३/२/२०१५.

२) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांचे पत्र क्र.सभा/निरंक, दिनांक ५ मे, २०१५.

३) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक-तीक्षेवी-२०१५/प्र.क्र.१६/१४४४ दिनांक २५ मे, २०१५.

४) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, नागपूर यांचे पत्र क्रमांक-जिनिस/कार्या-३७/का-४/१०६७/२०१५ दिनांक २०/६/२०१५.

५) मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/७/२०१५ रोजी संपन्न झालेल्या आराखड्याच्या सादरीकरणाबाबतच्या बैठकीचे इतिवृत्त.

६) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांचे पत्र क्र.का.अ.(प्र)/६७३१ दिनांक ९/१०/२०१५.

७) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७/११/२०१५ रोजी झालेल्या शिखर समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

८) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र.जिनिस/कार्या-आस्थाविका/का-४/पर्यटन/२१४८/२०१५ दिनांक ७/१२/२०१५.

९) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-विअप्र-२०१४/प्र.क्र.४९/१४/विनियम, दि.५/१/२०१५.

१०) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक २१/१२/२०१५.

शासन निर्णय :-

उपरोक्त अनु.क्र.१० येथील शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक-नासुप्र-२०१५/युओआर-५८/प्र.क्र.११४/नवि-२६, दि.२१/१२/२०१५ अन्वये श्री.महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी, ता.कामठी, जि.नागपूर या तीर्थस्थळाच्या टप्पा क्र.१ व टप्पा क्र.२ च्या एकूण रु.१८५.२३ कोटीच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.२ मध्ये प्रशासकीय मान्यता देताना अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. सदरहू अटी व शर्तीतील अट क्र.२(४) बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने आता नागपूर सुधार प्रन्यासला या कामासाठी नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी व तांत्रिक मंजूरी देण्याचे संपूर्ण अधिकार नागपूर सुधार प्रन्यासाकडे आहेत. त्यामुळे पुनःश्च तांत्रिक मंजूरी देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सचिव समितीसमोर प्रस्ताव जाणे योग्य होणार नाही, असे अभिप्राय दिले आहेत. तरी त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी.

०२. सदरचा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २३/१२/२०१५ रोजी नस्तीवर दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०२१६२८०१४१२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.01.05 12:55:00 +05'30'

(ज.ना.पाटील)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.मंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव.
३. मा.मंत्री, ऊर्जा नवीन व नवीकरणीय ऊर्जा तथा पालकमंत्री नागपूर यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव.
५. मा.राज्यमंत्री, नगरविकास यांचे खाजगी सचिव.
६. नागपूर जिल्ह्यातील संबंधित संसद सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.
७. मा.अध्यक्ष, नागपूर जिल्हा परिषद, नागपूर.
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (नवि-१), सचिव (नवि-२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
१३. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
१४. जिल्हाधिकारी नागपूर, नागपूर.
१५. पोलीस महानिरीक्षक, नागपूर/ पोलीस अधिक्षक नागपूर.
१६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर.
१७. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.नागपूर विभाग, नागपूर.
१८. विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर विभाग, नागपूर.
१९. निवड नस्ती, कार्यासन नवि-२६, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.